# रे.दि.मु.नं. ५५८/२०१७ मधील नि.३३ खालील आदेश

(संभाजी हरीबा बुरुंगुले वि. विलास नामू घुटूकडे-५)

CNR No.MHSO20-002201-2017

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीची मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळणेचा व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ईश्वरा नामु घुटूकडे हे दि.०३/०५/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने सदर दाव्यातील मयत प्रतिवादीचे वारस यांचा हक्क दावा मिळकतीत असल्यामुळे प्रस्तुत दाव्यातील मयत प्रतिवादीचे वारसांना दावा हेडिंगमध्ये रेकॉर्डवर आणणे हिताचे झालेले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे दिलेल्या म्हणणे मध्ये त्यांनी वादी यांना दंड करण्याचा अटीवर मंजूर करण्यास नाहरकत दर्शविले.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील मजकूर आणि दाव्याचे स्वरुप पाहिले असता, असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीची मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळणेचा व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार समाविष्ठ करणे आवश्यक आहे. आवश्यक पक्षकारांच्या अभावामुळे दाव्यांस तांत्रीक अडचण राहू शकते. सर्व पक्षकारांच्या समावेशाशिवाय दाव्याचा निकाल, अंमलबजावणी योग्य होणे शक्य नाही ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. वादी करु इच्छीत असलेली दुरुस्ती केल्याने प्रतिवादींच्या न्याय्य हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही. याउलट दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी संदिग्धता राहणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे, त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात किंवा विषयात बदल होणार नाही. अर्ज नामंजूर केल्यास वादी कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यामुळे दोन्हीं पक्षकारांमध्ये वाद मिटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता

टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि. ३३ मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादीने अर्जामध्ये मागितलेली दावा दुरुस्ती करुन, दावा दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Digitally signed by BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Date: 2022.06.27 12:11:12 +0530

सांगोला. (सौ. बी. मधुकर पोतदार)
दिनांक: २४/०६/२०२२. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24.06.2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 27.06.2022 |